| CNR No. MHRT080002312021 | दाखल तारीख – ०८/०४/२०२१ |
|---|---|
| | नोंदणी तारीख – ०८/०४/२०२१ |
| | निकाल तारीख – १०/०३/२०२६ |
| | कालावधी – ०४ वर्षे ११ महिने ०२ दिवस |

**फॉर्म नं. XXXII**

**भाग 'अ'**

**(फौजदारी नियमावलीचा प्रकरण VI चा परीच्छेद ४४ (i)**

**देवरुख येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात,**

**ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.**

**(पिठासीन अधिकारी – रोहिणी रा. कुलकर्णी)**

**न्यायनिर्णय दिनांक १०/०३/२०२६**

| फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ७६/२०२१ | निशाणी क्रमांक – २८ |
|---|---|
| **अर्जदार** | १. वैभवी विकास सावंत,<br>(**पुर्वाश्रमीची** – सुमन सखाराम दळवी)<br>**वय** – ३५ वर्षे, **व्यवसाय** – काही नाही,<br><br>२. आशिष विकास सावंत,<br>**वय** – १४ वर्षे, **व्यवसाय** – शिक्षण,<br><br>३. जान्हवी विकास सावंत,<br>**वय** – १२ वर्षे, **व्यवसाय** – शिक्षण,<br>अर्जदार क्र. ०१ स्वतःकरीता व अर्जदार क्र. ०२ व ०३ ची अ.पा.क.आई म्हणुन, |

| | |
|---|---|
| | **<u>सर्व राहणार</u>** – देवरुख, पर्शरामवाडी,<br>ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी. |
| **उपस्थिती** | श्रीमती पी. सी. चव्हाण, अर्जदारांतर्फे विद्वान विधीज्ञा. |
| **सामनेवाला** | विकास काशिनाथ सावंत,<br>**वय** – ४० वर्षे, **व्यवसाय** – रिक्षा चालक,<br>**राहणार** – २८५ क्रांतीनगर, बी. एस. के. कम्पाउंड, बैल बाजार, कुर्ला अंधेरी रोड, दत्त मंदीर कुर्ला (वेस्ट), मुंबई – ४०००७०. |
| **उपस्थिती** | निरंक |

**भाग ब**

**<u>(फौजदारी नियमावलीचा प्रकरण VI चा परीच्छेद ४४ (ii)</u>**

| |
|---|
| लागू नाही. |

## <u>न्यायनिर्णय</u>

**(<u>खुल्या न्यायालयात घोषित</u>)**

प्रस्तुतचा अर्ज ***<u>फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १२५ अन्वये</u>***, दरमहा पोटगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**०२) अर्जाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे –**

अर्जदार क्रमांक ०१ व सामनेवाला यांचा विवाह दिनांक १६/०५/२००६ रोजी मौजे बोंडये, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथे हिंदू धर्म शास्त्राप्रमणे व कुणबी समाजाच्या चालीरितीनुसार व दोघांच्या घरच्यांच्या संमतीने

झाला. लग्नानंतर अर्जदार क्र. ०१ ही सामनेवाला यांच्या घरी बोंडये, येथे नांदावयास गेली होती. तेथे फक्त ०८ दिवस अर्जदार क्र. ०१ व सामनेवाला राहिले व तेथुन अर्जदार क्र. ०१ व सामनेवाला कुर्ला, मुंबई बैलबाजार येथे सामनेवाला याच्या खोलीत राहावयास गेली.

०३) अर्जात पुढे असे कथन आहे की, अर्जदार क्र. ०१ ही कुर्ला, मुंबई बैलबाजार येथे सामनेवाला यांची आई–वडील, बहीण व अर्जदार क्र. ०१ असे एकत्र राहत होते. लग्नानंतरचे सुरुवातीचे ०२–०३ महिने सामनेवालाने अर्जदार क्र. ०१ हिला व्यवस्थीत वागविले. सामनेवाला हा दारुचा व्यसनी असुन तो दारु पिवुन अर्जदार क्र. ०१ हिला अश्लील व अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करीत असे. रात्री एक दोन वाजेपर्यंत सामनेवाला घरी येत नसे. घरी आल्यानंतर अर्जदार क्र. ०१ ने उशिर का झाला असे विचारले असता, तो जुगार खेळत होतो, असे उत्तर अर्जदार क्र. ०१ हिला देत असे. तसेच अर्जदार हिला शारीरीक व मानसिक त्रास देत असे. परंतु, सामनेवालाचे आई–वडील सामनेवाला यास तसे करण्यापासुन रोकत नसत. अर्जदार क्र. ०१ हिला सामनेवाला पासुन अर्जदार क्र. ०२ व ०३ ही मुले झालेली आहेत. त्यानंतरही, सामनेवाला याचे वर्तनात सुधारणा झालेली नाही. अर्जदार क्र. ०२ व ०३ यांचा जन्म अर्जदार क्र. ०१ च्या माहेरीच झालेला असुन बाळंतपणाचा खर्चही अर्जदार क्र. ०१ च्या माहेरच्यांनी केलेला आहे. लग्नामध्ये अर्जदार क्र. ०१ च्या आईने अर्जदार क्र. ०१ ला घातलेले सोन्याचे मंगळसुत्र व नथ सामनेवाला याने लग्नानंतर विकुन टाकलेले आहेत. तसेच सामेनवाला याने घातलेले दागिनेही त्याने विकुन टाकलेले आहेत.

०४) अर्जात पुढे असे कथन आहे की, दोन्ही मुलांच्या जन्मानंतर देखील सामनेवाला याच्या वर्तनात सुधारणा झालेली नाही. अर्जदार यांना सामनेवाला काहीही पैसे, कपडालत्ताही देत नसे. अखेर अर्जदार क्र. ०१ लोकांची धुणीभांडी करुन

स्वतःच्या व मुलांच्या गरजा भागवत असे. घरखर्चही अर्जदार क्र. ०१ ला करावा लागत असे. सामनेवालाची आई, बहीण अर्जदार क्र. ०१ ला छळत असत. सामनेवाला याने अर्जदार क्र. ०१ शी वाईट वागावे म्हणुन सामनेवाला याची आई व बहीण सामनेवाला याच्या मनात सारखे अर्जदार क्र. ०१ च्या विरोधात भडकवत असे. सामनेवाला याची बहीण घटस्फोटीत असुन ती माहेरीच राहते.

**०५)** अर्जात पुढे असे कथन आहे की, अर्जदार क्र. ०१ हिला सामेनवाला नेहमी मारहान करुन जीवे मारण्याची धमकी देत असे. अर्जदार क्र. ०१ हिला 'सामनेवाला नेहमी चाकु घेवुन तुला मारुन टाकतो', असे सामनेवाला म्हणत असे. तसेच गॅस सिलेंडर उघडा ठेवुन तुला जाळुन टाकेन असे म्हणत असे. सामेनवाला क्र. ०१ ते ०३ यांना गॅलरीत कोंडुन ठेवत असे व मुलांनाही दडपणाखाली ठेवत असे. त्यामुळे अर्जदार क्र. ०१ ते ०३ घाबरुन रहात असत. रात्री सामनेवाला वारंवार भांडण करत असे व भांडुन झाल्यानंतर जेवणामध्ये पाणी ओतुन ठेवत असे. त्यामुळे रात्री अर्जदार यांना उपाशीच राहावे लागत असे. सामनेवाला अर्जदार क्र. ०१ हिला बेदम मारहान करत असे. अनेकवेळा अर्जदार क्र. ०१ सामनेवाला याने मारहान केल्यामुळे बेशुध्द पडायची.

**०६)** अर्जात पुढे असे कथन आहे की, सामेनवाला हा रिक्षा चालक म्हणुन काम करतो. त्याचे वडील वॉचमन म्हणुन काम करतात. सामनेवालाची बहीणही नोकरी करते. सामेनवाला यास त्याच्या व्यवसायातुन दर महिन्याला सुमारे रक्कम रुपये २०,०००/– (रक्कम रुपये वीस हजार मात्र) इतके उत्पन्न मिळते. सामनेवाला याचेवर अर्जदार क्र. ०१ ते ०३ यांचेव्यतीरिक्त अन्य कोणीही अवलंबुन नाही. सामनेवाला याचे वाईट वर्तनामुळे अर्जदार क्र. ०१ हिला सामनेवालान पतीसुखापासुन वंचित ठेवले आहे. तसेच मुलांना पित्याच्या प्रेमापासुन दुर ठेवले आहे. अर्जदार क्र. ०१ ते ०३

स्वतःचे पालनपोषण करण्यास असमर्थ आहेत. वरील कारणांमुळे अर्जदारांनी समानेवालाकडून दरमहा प्रत्येकी रक्कम रुपये ३,०००/- (रक्कम रुपये तीन हजार मात्र) पोटगी मिळणेची विनंती केली आहे. अर्जाच्या पुष्ठयर्थ निशाणी क्रमांक ०२ अन्वये प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आले आहे.

०७) सामनेवाला याने विधीज्ञ श्री. पी. पी. मांगले यांचेमार्फत हजर होवुन सदर अर्जावर निशाणी क्रमांक ०८ कडे म्हणणे दाखल केले आहे की, अर्जदार क्र. ०१ हिला प्रस्तुतचा अर्ज दाखल करणेचा कोणताही नैतिक तसेच कायदेशीर हक्क नाही. अर्जदार क्र. १ हिने सामनेवाला यास पती म्हणून कधीही सुख दिलेले नाही. तसेच, सामनेवालाचे आई वडिल व बहिण यांचेशी कधीच आदराने वागलेली नाही. विवाहानंतर काही दिवसांनी अर्जदार क. ०१ ही सामनेवाला व त्याचे आई वडिल, बहिणी सोबत मुंबई येथे राहू लागली. अर्जदार क. ०१ हिला सामनेवाला याचे आई वडील व बहिण यांचेसोबत एकत्र राहणे आवडत नव्हते. त्यामुळे छोटया छोटया कारणांवरुन अर्जदार हि सामनेवाला याचेशी वाद घालत असे.

०८) सामनेवाला याचे म्हणणे पुढे असे आहे की, विवाहानंतरचे काही महिने अर्जदर क्र. ०१ ही सामनेवाला व त्याचे कुटुंबियांशी नीट वागत होती. परंतु, काही दिवस गेल्यानंतर अर्जदार क्र. ०१ ही सामनेवालाशी वाद घालू लागली. अर्जदार हिस नेहमीच सामनेवालाचे आईवडिलांपासून वेगळे राहायचे होते. याबद्दल ती सामनेवालाला सांगत असे, परंतु सामनेवाला या गोष्टीला नकार देत असे. त्यामुळे, अर्जदार ही सामनेवाला सोबत भांडण करीत असे. विवाहानंतर काही वर्षांचा कालावधी चांगला गेला. त्यानंतर, अर्जदार ही सामनेवाला व त्याचे कुटुंबियांशी दुर्व्यवहार करु लागली. अर्जदार हिने सामनेवालाला कधीही प्रेमाची वागणूक दिलेली नाही. सामनेवालाच्या आई वडिलांना उर्मटपणे बोलत असे. सामनेवालाची बहिण माहेरी राहत असल्याने

तिला सतत टोमणे मारत असे व या–ना त्या कारणाने भांडण करीत असे. याबाबत सामनेवालाने अनेकवेळा अर्जदार क्र. ०१ ची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. परंतु अर्जदार क. ०१ चे वर्तणुकीत कधीही फरक पडला नाही.

०९) सामनेवाला याचे म्हणणे पुढे असे आहे की, अर्जदार क्र. ०२ व ०३ च्या जन्मानंतर देखील अर्जदार क. ०१ ही तिचे वागणे बंद करत नव्हती. सामनेवालाचे आई वडील हे अर्जदार क्र. ०२ व ०३ यांची देखभाल करीत असत तरीही अर्जदार ही त्यांना त्रास देत असे. त्यांच्याशी वाद घालत असे. सामनेवाला हा त्याला मिळणारे सर्व उत्पन्न अर्जदार क. ०१ चे हातात देत असे. तसेच दोन्ही मुलांच्या म्हणजेच अर्जदार क्र. ०२ व ०३ च्या सर्व गरजा पूर्ण करत होता. त्यांना चांगले शिक्षण घेता यावे. त्यांचे भविष्य उज्वल व्हावे यासाठी खूप मेहनत घेत होता. परंतु अर्जदार क्र.१ ही पैशावरुन नेहमीच तक्रार करत असे. सामनेवालाची बहिण ही माहेरीच राहत असल्यामुळे अर्जदार क. ०१ हि नेहमीच सामनेवालाचे बहिणीचे माहेरी राहण्यावरुन तक्रार करीत असे व सामनेवाला यास धमकी देत असे की, "तुझे बहिणीला वेगळे राहायला सांग नाहीतर मी माझे मुलांना घेवून माहेरी जाऊन राहते". त्यामुळे सामनेवाला यास मानसिक त्रास होत असे. तो अर्जदार क्र. ०१ हिस समजावत असे. परंतु, ती काहीही ऐकून घेत नसे. रिक्षा व्यवसायातून मिळणारे उत्पन्न हे अनियमित असते. त्यामुळे एखाद्या वेळी सामनेवालाने अर्जदार क. ०१ हिस कमी पैसे दिले तर ती सामनेवाला यास म्हणत असे "तुम्ही रोज बाहेर जाऊन दारु पिता म्हणून पैसे कमी देता'', असे म्हणून त्याचेशी वाद घालत असे. सामनेवाला याने अर्जदार क्र. ०१ हिस कधीही मारहाण केलेली नाही व शिवीगाळ देखील केलेली नाही किंवा तिच्या जीवाला हानी होईल असे कोणतेही कधीही कृत्य केलेले नाही.

१०) सामनेवाला याचे म्हणणे पुढे असे आहे की, सामनेवालाचे आई वडील व

बहिण देखील अर्जदार क्र. ०१ सोबत चांगले वागत असत. परंतु, अर्जदार क्र. ०१ ही सतत भांडण करीत असे व त्यांना मानसिक त्रास देत असे. दिनांक १५/०५/२०१७ रोजीपासून अर्जदार क. ०१ ही अर्जदार क. ०२ व ०३ ला घेवून वादाचे कारण घडले नसताना स्वतःचा हट्ट पुरविण्यासाठी व सामनेवाला व त्याचे कुटुंबाला त्रास देणेसाठी तिचे माहेरी येवून राहू लागली. मधल्या कालावधीत सामनेवाला ने अनेक वेळा अर्जदार क्र. ०१ ची समजूत घालण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु, अर्जदार क्र. ०१ हिने सामनेवालाचे काहीही ऐकून घेतलेले नाही. सामनेवाला यास त्रास देणेसाठी अर्जदार क्र. ०१ हि अर्जदार क्र. ०२ व ०३ ला देखील सामनेवाला भेटणेपासून त्याचेशी फोनवर बोलणेपासून वंचित ठेवत असे व ठेवत आहे.

**११)** सामनेवाला याचे म्हणणे पुढे असे आहे की, मार्च २०21 रोजी सामनेवाला हा दोन्ही मुलांना म्हणजेच अर्जदार क्र. ०२ व ०३ यांना भेटणेसाठी गेला असता अर्जदार क. ०१ हिने त्याचे सोबत भांडण केले व मुलांना भेटणेस नकार दिला. व मुलांच्या मनात सामनेवाला विषयी वाईट भरवून ठेवले व सामनेवाला याला त्रास देणेचे हेतूने सदरचा पोटगीचा अर्ज दाखल केला. सन २०१७ ते २०२१ या कालावधीत सामनेवाला तसेच त्याचे कुटुंबीयांनी अनेक वेळा अर्जदार क. ०१ हिस समजावणेचा व नांदायला येणेसाठी प्रयत्न केला. परंतु, अर्जदार क्र. ०१ हिने स्वतःच्या हट्टापोटी कधीही समजून घेतले नाही व नांदायला येणेस तयार झालेली नाही.

**१२)** सामनेवाला याचे म्हणणे पुढे असे आहे की, सामनेवाला याने रत्नागिरी येथील मे. जिल्हा सत्र न्यायाधीश सो. यांचे न्यायालयात मुलांचा ताबा मिळणेसाठी दि.कि.अ.नं.०३/२०२२ हा दाखल केलेला आहे. केवळ सामनेवाला व त्याचे कुटुंबाला त्रास व्हावा, म्हणून अर्जदार क. ०१ हिने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार क्र.१ ही शरीराने धडधाकट आहे. अर्जदार क. ०१ ही देवरुख येथील

आमडेकर उपहार गृह येथे नोकरीस करत असून तिला दरमहा रक्कम रुपये ८,०००/– इतका पगार मिळतो. ती स्वतः कामधंदा करुन उत्पन्न मिळवू शकते व स्वतःची व अर्जदार क्र. ०२ व ०३ यांची गुजराण करु शकते. अर्जदार क्र. ०१ ही कोणतेही संयुक्तिक कारण घडलेले नसताना अर्जदार क्र. ०१ ही केवळ स्वतःच्या हट्टापोटी अर्जदार क्र. ०१ व ०२ यांना घेवून दिनांक १५/०५/२०१७ पासून वेगळी राहत आहे. सामनेवाला हा पूर्णपणे बेकार असून त्याच्याकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. तसेच त्याचे नावे कोणतीही स्थावर व जंगम मालमत्ता नाही. तो रिक्षा व्यवसाय करतो. त्यातून त्याला रक्कम रुपये ५,०००/– उत्पन्न मिळते. सामनेवाला हा अर्जदार क्र. ०२ व ०३ यांस सांभाळणेस व अर्जदार क्र. ०१ सोबत संसार करणेस तयार आहे. अर्जदार क्र. ०१ ही स्वतःच्या हट्टापोटी स्वतःचे संसाराचे व अर्जदार क्र. ०२ व ०३ यांचे भविष्याचे नुकसान करीत आहे. अर्जदार क्र. ०१ हिस सामनेवाला सोबत रहावयाचे नाही. त्यामुळे सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. तरी वरील सर्व कारणांसाठी अर्जदारचा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा, असे म्हणणे दाखल केले आहे.

**१३**) प्रकरण प्रलंबित असताना, सामनेवालातर्फे विधीज्ञ श्री. पी. पी. मांगले यांनी त्यांचे वकीलपत्र रद्द केले आहे. परंतु, त्यानंतर, सामनेवाला याने कोणतेही नवीन विधीज्ञ यांची त्याच्या वतीने काम पाहण्यासाठी नियुक्ती केलेली नाही.

**१४)** अर्जदारांतर्फे विधीज्ञा यांचा युक्तीवाद ऐकला. सामनेवालातर्फे युक्तीवादासाठी कोणीही हजर न राहिल्याने त्याच्या युक्तीवादाशिवाय अर्ज पुढे चालविण्यात आल्याचा आदेश पारीत करण्यात आला आहे. अभिलेख पाहिले.

**१५)** दोन्ही बाजूंचे विरुध्द अभिकथनांवरुन, खालीलप्रमाणे मुद्दे विचारार्थ उपस्थित होतात व त्यांचे कारणांसह निष्कर्ष मी पुढीलप्रमाणे नोंदवित आहे–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अर्जदारांनी हे सिध्द केले काय की, कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय सामनेवाला हा अर्जदारांचे पालन पोषण करण्यास जाणून बुजून दुर्लक्ष करीत आहे किंवा नकार देत आहे ? | **...अंशतः होय, केवळ अर्जदार क्र. ०१ व ०३ यांचे.** |
| २) | अर्जदारांनी हे सिध्द केले काय की, त्यांना पोटगी देण्याची सामनेवाला याची पुरेशी ऐपत/क्षमता आहे ? | **...अंशतः होय, केवळ अर्जदार क्र. ०१ व ०३ यांना.** |
| ३) | अर्जदार हे सामनेवाला याच्याकडून पोटगी दरमहा मिळण्यास पात्र आहेत काय? असल्यास, कोणत्या दराने? | **...अंशतः होय, केवळ अर्जदार क्र. ०१ व ०३ यांना, अंतिम आदेशाप्रमाणे.** |
| ४) | अंतिम आदेश काय ? | **...अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्रमांक ०१ ते ०३ बाबत** –

**१६)** सदर मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने व पुरावा एकत्रात आल्याने त्यांचे विवेचन एकत्रीतपणे करण्यात येत आहे. अर्जदार व सामनेवाला यांचे कथन पाहिले असता, त्यांच्यातील नातेसंबंध वादातीत नाहीत. वैभवी (अ.सा.क्र.०१) हिने आपल्या

पुराव्याच्या शपथपत्रामध्ये अर्जातील सर्व मजकूर कथन केला असून पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्याचे विवेचन पुन्हा करण्यात येत नाही. संधी मिळूनही सामनेवाला याने प्रकरणात पुरावा देवुन अर्जदारांचे म्हणणे खोडून काढले नाही किंवा अर्जदार क्रमांक ०१ चा उलटतपास घेतलेला नाही. सबब, वैभवी (अ.सा.क्र.०१) हिचे साक्षीतील कथन विनाआव्हानीत झाल्याने अबाधित राहिले आहे. तिने तिच्या पुराव्याच्या शपथपत्रात कथन केल्याप्रमाणे, सामनेवालाला एप्रिल – २०१७ मध्ये दारु पिवुन अर्जदार क्र. ०२ व ०३ यांचेसह त्या सर्वांना मारहान करुन घराबाहेर काढल्याने सर्व अर्जदार हे अर्जदार क्र. ०१ च्या माहेरी राहत आहेत. सदरची बाब सामनेवाला याने विरुध्द पुरावा देवुन खोड्डुन काढलेली नसल्याने ती नाकारण्यास कोणतेही कारण उरत नाही.

**१७)** अर्जदार क्र. ०१ ने सामनेवाला हा रिक्षा चालक म्हणुन काम करीत असुन त्यापासुन त्याला दर महिन्याला सुमारे रक्कम रुपये २०,०००/– (रक्कम रुपये वीस हजार मात्र) इतके उत्पन्न मिळत असल्याचे नमूद केले आहे. सामनेवाला याने त्याच्या म्हणण्यामध्ये रिक्षा व्यवसायापासुन त्याला रक्कम रुपये ५,०००/– (रक्कम रुपये पाच हजार मात्र) इतके उत्पन्न मिळकत असल्याचे कथन मांडले आहे.

**१८)** अर्जदार क्र. ०१ ने तिच्या पुराव्याच्या शपथपत्रात अर्जदार क्र. ०२ हा सज्ञान झाला असल्याचे कथन केले आहे. त्यामुळे, सज्ञान झालेल्या मुलाचा सांभाळ तो स्वतः करु शकतो. अर्जदार क्र. ०१ व अर्जदार क्र. ०३ या दोघी अनुक्रमे सामनेवालाच्या पत्नी व मुलगी असल्याने त्यांचा सांभाळ करणे, ही सामनेवाला याची नैतिक व कायदेशीर जबाबदारी आहे. अर्जदारांना सामनेवाला याने स्वतःहून घराबाहेर काढुन त्यांचा त्याग केल्याचे वैभवी (अ.सा.क्र.०१) हिने शपथेवर कथन केले असून, ती बाब सामनेवाला याने खोड्डुन काढलेली नाही. अर्जदार ही आज रोजी अर्जदार क्र. ०२ व ०३ सह तिच्या माहेरी राहत आहे. तिला स्वतःचे कोणतेही उत्पन्न नाही.

सामनेवाला याने अर्जदार क्र. ०१ हिला उपहारगृहातील नोकरीपासुन दरमहा रक्कम रुपये ८,०००/– (रक्कम रुपये आठ हजार मात्र) इतके उत्पन्न मिळत असल्याचे म्हणणे मांडले आहे. परंतु, त्याबाबत कोणताही पुरावा सामनेवाला याने अभिलेखावर दाखल केलेला नाही. याउलट, अर्जदार क्र. ०१ हिचे कोणतेही उत्पन्न नसल्याचे तिने शपथेवर कथन केले असुन सदरचे कथन विना आव्हानीत राहिले आहे. त्यामुळे, ते नाकारण्यास कोणतेही कारण उरत नाही. अशा परीस्थीतीत, सामनेवाला याने अर्जदार क्र. ०१ व ०३ यांच्या निर्वाह भत्याची सोय करणे कायदेशीर आहे.

**१९)** अर्जदारांच्या कथनानुसार, सामनेवाला हा रिक्षा चालक म्हणुन काम करतो. त्यापासुन त्याला दर महिन्याला सुमारे रक्कम रुपये २०,०००/– (रक्कम रुपये वीस हजार मात्र) इतके उत्पन्न मिळत असून त्याचेवर सामनेवाला व्यतीरीक्त इतर कोणीही अवलंबून नाही. सदरची बाब अर्जदाराने पुराव्यात शपथेवर कथन केली असून ती विनाआव्हानीत राहिल्याने दैनंदिन महागाई, अर्जदार क्र. ०३ हिचे शिक्षण, सामनेवाला याच्यावर अवंलबुन असणाऱ्या व्यक्ती, उभय पक्षकारांचा राहण्याचा दर्जा व सामनेवाला याचे कथनानुसार त्याचे उत्पन्न पाहता, अर्जदार क्र. ०१ हिला सामनेवालाकडून दरमहा रक्कम रुपये २,०००/– (रुपये दोन हजार मात्र) व अर्जदार क्र. ०३ हिला प्रत्येकी रक्कम रुपये १,०००/– (रुपये एक हजार मात्र) इतकी पोटगी देण्याचा आदेश करणे न्यायोचित वाटते. तसेच, प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास अर्जदारांना सामनेवालाने भाग पाडल्यामुळे प्रस्तुत अर्जाचा खर्च रक्कम रुपये ३,०००/– (रक्कम रुपये तीन हजार मात्र) सामनेवालाकडून मिळण्यास अर्जदार पात्र आहेत. अर्जदार क्र. ०२ हा सज्ञान झाल्याने त्यास सामनेवालाकडुन दरमहा पोटगी देण्याचा आदेश करणे न्यायोचीत नसल्याने ती विनंती याद्वारे नामंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मुद्दे क्रमांक ०१ ते ०३ चे निष्कर्ष मी त्याप्रमाणे नोंदविले आहेत.

**<u>मुद्दा क्रमांक ०४ बाबत</u>** –

२०) मुद्दे क्रमांक ०१ ते ०३ च्या विश्लेषणांवरुन व निष्कर्षांवरुन अर्ज हा अंशतः मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी मुद्दा क्रमांक ०४ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे –

## <u>आदेश</u>

१) अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२) सामनेवाला याने अर्ज दाखल केलेल्या तारखेपासून अर्जदार क्र. ०१ हिला दरमहा पोटगी म्हणून रक्कम रुपये **२,०००/–**(रक्कम रुपये दोन हजार मात्र) व अर्जदार क्र. ०३ हिला रक्कम रुपये **१,०००/–**(रक्कम रुपये एक हजार मात्र) द्यावेत. अर्जदार क्र. ०२ यास सामनेवालाकडुन दरमहा पोटगी मिळण्याची विनंती याद्वारे नामंजुर करण्यात येत आहे.

३) प्रस्तुत अर्जाच्या खर्चापोटी समानेवाला याने अर्जदार क्र. ०१ हिला रक्कम रुपये **३,०००/–** (रक्कम रुपये तीन हजार मात्र) द्यावेत.

४) प्रस्तुत अर्जाची प्रत अर्जदार क्र. ०१ हिला विनाशुल्क देण्यात यावी.

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.04.02 18:42:04 +0530

**दिनांक – १०/०३/२०२६** (रोहिणी आर. कुलकर्णी)

**देवरुख.** **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, देवरुख,**

**जि. रत्नागिरी.**

## परिशिष्ट I

## भाग क

## (फौजदारी नियमावलीचा प्रकरण VI परीच्छेद ४४ (iii)

## अर्जदारपक्षातर्फे साक्षीदारांची यादी

| अनुक्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १. | वैभवी विकास सावंत – पुर्वाश्रमीची – सुमन सखाराम दळवी – निशाणी क्रमांक २६ | मूळ अर्जदार |

## सामनेवालापक्षातर्फे साक्षीदारांची यादी

| अनुक्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| **निरंक** | | |

## न्यायालयीन साक्षीदारांची यादी

| अनुक्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | | |

## अर्जदारातर्फे निशाणी क्रमांकांची यादी

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | | |

## सामनेवालापक्षाने मान्य केलेल्या कागदपत्रांची यादी

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|

| |
|---|
| निरंक |

**<u>सामनेवालापक्षातर्फे निशाणी क्रमांकांची यादी</u>**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | | |

**<u>न्यायालयीन निशाणी क्रमांकांची यादी</u>**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | | |

**<u>मुद्देमाल</u>**

| |
|---|
| **लागू नाही.** |

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.04.02 18:42:13 +0530

**दिनांक – १०/०३/२०२६** (रोहिणी आर. कुलकर्णी)

**देवरुख.** **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, देवरुख,**

**जि. रत्नागिरी.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P. D. F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. A. Bhale |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 10/03/2026 |
| Order signed by the presiding officer on | : | 02/04/2026 |
| Order uploaded on | : | 02/04/2026 |